विकअ- २०७७/आस्था-२/अविआ/७००

९८

विशेष राज्यकर आयुक्त यांचे कार्यालय,
३ रा मजला, वस्तू व सेवाकर भवन,
माझगांव, मुंबई - ४०० ०१०.
दिनांक : 5 JUL 2019

संदर्भ- १) विक्रीकर आयुक्त/२०६/विविआ- विसआ नियंत्रण/ब-८०० दि. २२/०५/२०१६.

## -: आदेश :-

उपरोक्त संदर्भान्वये अपर राज्यकर आयुक्त (व्यवसायकर व इतर कायदे), मुंबई (तत्कालीन अपर विक्रीकर आयुक्त (व्यवसायकर)) यांच्याकडे स्तंभ क्र. ३ मध्ये प्रदान करण्यात आलेले विषय व स्तंभ क्र.४ मध्ये दर्शविलेल्या नोडल शाखांवर, अपिलीय अधिकारी व विभागांवर प्रत्यक्ष नियंत्रण राहिल असे आदेश निर्गमित करण्यात आले होते.

सदर अपर राज्यकर आयुक्त, व्यवसायकर व इतर कायदे, मुंबई या कार्यभारातील राज्यस्तरीय विवरणपत्रे, वसूली व अपिले संदर्भातील कामकाजासाठी मुख्य समन्वयक अधिकारी म्हणून श्री. गोविंद वसंतराव बिलोलीकर, राज्यकर सहआयुक्त (अपिले) २, मुंबई (महाविकास सांकेतांक CST-APP-F-००२) यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

तसेच संपूर्ण राज्यासाठी ऊस खरेदी कर कायद्याचे प्रशासन व नियंत्रणाच्या कामकाजासाठी मुख्य समन्वयक अधिकारी म्हणून देखील श्री. गोविंद वसंतराव बिलोलीकर, राज्यकर सहआयुक्त यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

पुढील आदेश निर्गमित होईपर्यंत, श्री. गोविंद वसंतराव बिलोलीकर, राज्यकर सहआयुक्त (अपिले) २, मुंबई (महाविकास सांकेतांक CST-APP-F-००२) यांनी राज्यस्तरीय विवरणपत्रे, वसूली व अपिले संदर्भातील कामकाज तसेच संपूर्ण राज्यासाठी ऊस खरेदी कर कायद्याचे प्रशासन व नियंत्रणाचे कामकाज आपल्या मुळ पदाचा कार्यभार सांभाळून अतिरिक्त कार्यभार म्हणून पहावा.

या आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी.

**राज्यकर आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

प्रत :

१) अपर पोलिस महासंचालक व मुख्य दक्षता अधिकारी.
२) सर्व अपर राज्यकर आयुक्त.
३) सर्व राज्यकर सहआयुक्त
४) राज्यकर आयुक्तांचे विशेष कार्य अधिकारी.
५) संबंधित अधिकारी व त्यांचे कार्यालय.
६) निवडनस्ती.
७) स्थळप्रत.